# प्रयोगशाळांमधून आज विज्ञानपर्वणी

म. टा. प्रतिनिधी ■ पुणे
matapune@indiatimes.com

विज्ञान दिनाचे औचित्य साधून शहर व परिसरातील शैक्षणिक संस्था, प्रयोगशाळा आणि संशोधन संस्थांमध्ये उद्या (मंगळवारी) आणि बुधवारी विविध वैज्ञानिक कार्यक्रमांची पर्वणी उपलब्ध करून देण्यात आली आहे. ओपन डेच्या माध्यमातून हवामान संशोधन संस्थांसह आयुका-जीएमआरटीसारख्या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या संशोधनसंस्थांमधील खजिना विज्ञानप्रेमींसाठी खुला ठेवण्यात येणार आहे.

**भारतीय उष्णकटिबंधीय हवामानशास्त्र संस्था (आयआयटीएम)**

विज्ञानदिनाच्या निमित्ताने पाषाण येथील आयआयटीएम ही संस्था सकाळी ११ ते दुपारी चार या वेळेत सर्वांसाठी खुली राहणार आहे. या कालावधीत विद्यार्थी आणि नागरिकांना आयआयटीएममधील विविध प्रयोगशाळांना भेटी देता येणार असून, तेथील शास्त्रज्ञांशी हवामान, हवामानबदल या विषयी थेट संवाद साधता येणार आहे. हवामानाच्या अभ्यासासाठी वापरण्यात येणाऱ्या विविध यंत्रणा, रडार, सुपरकम्प्युटर याविषयीही यावेळी माहिती देण्यात येणार आहे.

**भारतीय हवामानशास्त्र विभाग (आयएमडी)**

शिवाजीनगर येथील आयएमडीचे आवार विज्ञान दिनाच्या निमित्ताने सर्वांसाठी दिवसभर खुले राहणार आहे. हवामानाच्या दैनंदिन निरीक्षणांसाठी वापरण्यात येणारी उपकरणे, स्वयंचलित यंत्रणा याविषयी हवामानतज्ज्ञ माहिती देतील. यावेळी आयोजित करण्यात आलेल्या विज्ञान प्रदर्शनातून विद्यार्थ्यांना वातावरण, हवामान, हवामानबदल यांविषयी माहिती घेता येईल.

**मुक्तांगण विज्ञानशोधिका (एक्सप्लोरेटरी)**

भारतीय विद्या भवन संस्थेच्या एक्सप्लोरेटरीतर्फे विज्ञानदिनाच्या निमित्ताने पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांच्या विज्ञान प्रकल्पांची स्पर्धा घेण्यात येत आहे. या स्पर्धेमधील तीनशेपैकी निवडक ६० प्रकल्पांचे प्रदर्शन संस्थेच्या सेनापती बापट रस्त्यावरील आवारात २८ आणि २९ फेब्रुवारीला सुरू राहणार आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन पुणे विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. पंडित विद्यासागर यांच्या हस्ते होणार आहे. सकाळी साडेदहा ते सायंकाळी पाच या वेळेत शालेय विद्यार्थ्यांना या प्रदर्शनाला भेट देता येईल.

**पुणे विद्यापीठ**

पुणे विद्यापीठातील विविध विज्ञान विभागांतर्फे विज्ञान दिनानिमित्त विज्ञान प्रदर्शन आणि व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवारी दिवसभर फिजिक्स, केमिस्ट्री, जिओग्राफी, जिओलॉजी, बॉटनी, झूलॉजी, मायक्रोबायोलॉजी, इलेक्ट्रॉनिक्स आदी विभागांमधील विद्यार्थी संबंधित विषयांमध्ये सुरू असणाऱ्या मूलभूत संशोधनाबद्दल प्रदर्शनातून माहिती देतील.

**शाळा- कॉलेजांसाठी 'सायन्स फिल्म फेस्टिव्हल'**

'विश्व साईंटिफिक' आणि केंद्र सरकारच्या 'विज्ञान प्रसार' या संस्थेच्या पुढाकाराने पुणे आणि पिंपरी- चिंचवड परिसरातील ५० शाळा- कॉलेजांमध्ये सायन्स फिल्म फेस्टिव्हलचे आयोजन करण्यात येणार आहे. भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, खगोलशास्त्र आणि पर्यावरण या विषयांवर आधारीत चार फिल्मची डीव्हीडी शाळा, महाविद्यालयांना मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

**Maharashtra Times, Pune, February 28, 2012. Pp.13**